▌पुस्तक ओळख ▌

दयानंद कनकदंडे

# स्त्रीवादाची साक्षेपी चर्चा

संसदेत व संसदेबाहेर अखिल भारतीय अथवा राज्य पातळीवरील सगळ्याच पक्षांच्या कार्यक्रमपत्रिका भांडवली विकासाच्या आहेत. विमानतळं, सहा-आठ पदरी रस्ते, मेट्रो रेल, मोनो रेल, स्मार्ट सिटीज हेच सगळ्या विकासाचे प्रारूप आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात शेतीखालची जमीन पुढच्या काळात काढून घेतली जाणार आहे. पाणी फक्त शहरांची गरज भागविण्यासाठी वळवले जाईल. यास्थितीत विकासाच्या दडपशाहीत 'नाही रे' वर्गातल्या स्त्रियांची गुलामी अधिक गडद होण्यासबंधीचे भाष्य विलास सोनावणे यांच्या 'बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने' या हर्मिस प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात येते. 'सगुणा' या त्रैमसिकात सोनावणे यांनी लिहिलेल्या स्त्री प्रश्नावरील लेखांचे संकलन म्हणजे हे पुस्तक होय. बहुजन स्त्रीवाद म्हणजे काय? भांडवलशाहीतील बदलती नाती, युरोपकेंद्री स्त्री प्रश्न, स्त्रिया कुठे आहेत?, आजची स्त्रीसत्ताः एक भ्रामक वास्तव, स्त्रिया गुलामच राहणार आदी प्रकरणांमधून सोनावणे यांनी जागतिक पातळीवरील बदलत्या भांडवलशाही प्रक्रियांची भारतीय समाजव्यवस्थेवर पडणाऱ्या परिणामांची चर्चा केली आहे.

मलपृष्ठावर म्हटल्याप्रमाणे जागतिकीकरणात मूल्यव्यवस्थेचा झालेला कचरा, वेल्फेयर स्टेट निकाली काढल्यामुळे एकंदर देश आणि तरुणापुढे विचित्र स्थिती उभी आहे. समृद्ध सगळं सपाट होण्याचा, वैविध्य संपवून सगळं एकसारखंच करण्याचा आणि कसलीही शाश्वती नसलेला काळ! जागतिकीकरणाचे प्रतिकूल

लेखक मुक्त पत्रकार तसेच युवा भारत संघटनेचे कार्यकर्ते आहेत.
ईमेल dayanandk77@gmail.com

परिणाम शेती-पर्यावरण-नैसर्गिक साधनसंपत्ती-पर्जन्य-भाषा-लोकजीवन-लोकसंस्कृती-आरोग्य-सजीवसृष्टी-मानवी नातेसंबंध आदींच्या संदर्भात जगभर तीव्रतेने जाणवत आहेत. याची अत्यंत खोलवरची चर्चा या पुस्तकात केली आहे. आपल्या बालपणाविषयीच्या आठवणीपासून सुरुवात करून आजच्या जगातल्या तुटत जाणाऱ्या नातेसबंधांकरिता भांडवलशाहीस ते जबाबदार धरीत असतानाच आपण या परिस्थितीकडे विषण्णपणे पाहत राहून इतिहासात किती छान होतं असं म्हणत स्वतःचीच करमणूक करत राहायचं की नव्या युगाच्या सामूहिकतेची व्याख्या करत आजची परिस्थिती बदलण्याची तयारी सुरू करायची हा मूलभूत प्रश्न ते उपस्थित करतात. जुनी व्यवस्था परत आणता येणार नाही. तंत्रज्ञानाचा जो काही विकास झाला आहे तो समाजकेंद्रित कसा होईल असा विचार सुरू केला तर वेगळा विचार करता येईल, असे लेखकाचे म्हणणे आहे.

इंग्रज आल्यानंतर त्यानी आणलेल्या उत्पादनाच्या नव्या व्यवस्थेने जात आधारित शेतीकेंद्रित उत्पादनव्यवस्थेत असलेल्या स्त्रियांच्या केल्या गेलेल्या बेदखलीकरणाची चर्चा करण्याची गरज त्यांनी या पुस्तकात व्यक्त केली आहे. नव्या उत्पादनव्यवस्थेने घेतलेला सामूहिकतेचा बळी ते एकूणच स्त्री-पुरुष देहाचे होत जाणारे क्रयवस्तुकरण याचा खोलवरचा विचार ते या पुस्तकात मांडताना दिसतात. महिला दिनाचे बदलते स्वरूप, प्रसाधन निर्मिती करणाऱ्या कंपन्यांच्या हातात गेलेला ८ मार्च, सत्तेत गेलेल्या स्त्रियांचं पुरुषी वागणं, सत्तेचा पुरुषसत्तावादी आशय यावरची चर्चा अतिशय उद्‌बोधक आहे. भांडवलशाही चौकटीतल्या सुधारणा ह्या कितीही क्रांतिकारी असल्या तरी जोपर्यंत समताआधारित स्त्रीसत्तेकडे जाण्याचा कार्यक्रम स्त्रीवादाच्या अजेंड्यावर येत नाही तोवर स्त्रियांचा वाढता भांडवली अवकाश पुरुषसत्तेला मजबूत करणारा आहे. म्हणून भांडवलशाही म्हणजे पुरुषसत्ता व समता म्हणजे स्त्रीसत्ता असे जेव्हा स्त्रिया म्हणायला लागतील तेव्हा खऱ्या अर्थाने कोंडी फुटायला लागेल. स्त्रीसत्तेचा विचार करायचा असेल तर ती निसर्ग-मानव केंद्रित आणि पूरक विकासाचा आग्रह धरणारी हवी. मात्र २१व्या शतकाच्या आजच्या घडीला (त्यांच्याच शब्दात) तंत्रज्ञानाचा जो काही विकास झालेला आहे तो नफा केंद्रित आहे, मग तो समाजकेंद्रित कसा होईल असा विचार सुरू केला तर स्त्रीसत्तेचा वेगळा विचार करता येईल' परंतु हा विकास कसा करायचा आणि त्याकरिता बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने जावयाची गरज काय? असा समाजकेंद्रित विकास साधावयाचा तर त्या कृतिकार्यक्रमाच्या दिशेने जावयाच्या शक्यता काय आहेत याची चर्चा मात्र हे पुस्तक फारशी करीत नाही हे खरेच.

ब्राह्मण स्त्रियांच्या मादीकरणाची चर्चा ते कालपर्यंत स्वकष्टाने स्वतःच्या समाजामध्ये कुशल म्हणून स्वाभिमानी असलेल्या स्त्रीला जिला भांडवलशाहीने अकुशल ठरवून मादीकरणाच्या प्रक्रियेत लोटले आहे त्या प्रक्रियेची व्याख्या करण्याचा प्रयत्न या पुस्तकात दिसतो आहे. जुन्या व्यवस्थेत ब्राह्मण स्त्रिया या माद्या होत्या. बहुजन स्त्रिया या फक्त माद्या नव्हत्या म्हणून त्यांचे आणि यांचे प्रश्न वेगळे आहेत अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. बहुजन स्त्रियांचे ब्रिटिश भांडवल प्रणित व्यवस्था येण्यापूर्वीचे प्रश्न जरी ब्राह्मण स्त्रियाप्रमाणे नव्हते तर ते कसे होते? शोषणसबंधाच्या ज्या व्यवस्था आकारास आल्या किंवा येत होत्या, त्या त्यांच्या लैंगिकतेचे दमन करीत होत्या म्हणून तर वारकरी, महानुभाव, लिंगायत हा विमर्श आकाराला येतो आहे ही बाब लक्षात घ्यायला हवी आहे. जातिव्यवस्था स्थितीशील होण्याचाही हा काळ आहे हे लक्षात घेतले तर बहुजन स्त्रियांचे जे शोषण होत होते त्याची चर्चा त्या फक्त माद्या नव्हत्या

म्हटल्याने संपते का हा प्रश्न आहे. मात्र त्याची चर्चा हे पुस्तक करीत नाही. सोबतच आजघडीला सगळ्याच स्त्रिया मादीकरणाच्या प्रकियेत लोटल्या जात आहेत असेही म्हटले आहे. नव्या व्यवस्थेत एकूणच स्त्रियांचे होणारे मादीकरण हा मुद्दा असेल तर जुन्या व्यवस्थेत ती मादी नव्हती असे बहुजन स्त्रियांना सांगितल्याने आणि जुन्या व्यवस्थेतही तुम्ही मादीच होता हे ब्राह्मण स्त्रियांना सांगितल्याने कुठला मुद्दा पुढे सरकणार आहे, याचे उत्तर मात्र हे पुस्तक वाचून सापडत नाही. सोनवणेंची चर्चा ब्राह्मणी स्त्रीवाद म्हणजे स्त्रीवादाला प्रतिक्रिया देत आणि दलित स्त्रीवादालाही प्रतिक्रिया देत उभा राहणारा बहुजन स्त्रीवाद हा ब्रिटिशपूर्व काळातील बहुजन स्त्रियांच्या स्थानाचे गुणगान करण्याच्या नादात बहुजन देशीवादी भूमिकेत शिरणारा आहे, असे वाटावयास लागते.

लेखक म्हणतो, यापुढील काळात खरे म्हणजे गेल्या वीस पंचवीस वर्षात समाजाकडे समग्रपणे न पाहता सुटे-सुटे करून पाहण्याची प्रवृत्ती जाणीवपूर्वक वाढविली गेली आहे. ऐंशी नव्वदपर्यंतच्या काळात साम्यवाद, समाजवाद, गांधीवाद, अगदी कुठे फुले-आंबेडकरवाद, अराजकवाद, अस्तित्ववाद या प्रत्येक वादाची घडण वेगवेगळी असली तरी त्याच्यात एक साम्य होते, ते समाजाचा समग्रपणे विचार करीत होते. पंच्याहत्तर सालापासून ही परिस्थिती बदलली. आधी स्त्रीवाद, दलितवाद व मग बहुजनवाद या सर्व वादांनी आपापल्या घटकांपुरता विचार करायला सुरुवात केली. १९७५ सालापासून जी स्त्रीवादाची चर्चा भारतात सुरू आहे ती युरोपियन स्त्रीवादाचे पाठांतर केलेल्या बहुतांश ब्राह्मण, सारस्वत व सीकेपी जातीतील स्त्रियांनी केली. दलित स्त्रीवादाची चर्चा नंतरच्या काळात सुरू झाल्याचे सांगत त्यांनी फक्त शहरी दलित स्त्रियांच्याच प्रश्नाला प्राधान्य दिल्याचे नोंदवून जर त्यांनी गावातील शेतमजूर स्त्रियांच्या प्रश्नाला भिडण्याचा प्रयत्न केला असता तर शेतीकेंद्रित उत्पादनव्यवस्थेतील स्थानाची, त्यांच्या श्रमाची चर्चा केंद्रस्थानी आली असती असा विचार मांडून ते बहुजन स्त्रीवादाची चर्चा सुरू करतात. आपल्याकडे दलित स्त्रीवाद, अब्राह्मणी स्त्रीवाद, सत्यशोधक स्त्रीवाद तसेच दलित-बहुजन स्त्रीवाद अशा प्रकारची चर्चा सुरू आहे. या चर्चेतून उभ्या राहिलेल्या प्रश्नांशी संवाद करीत व्यापक पातळीवर कृतिकार्यक्रमाच्या पातळीवर काय धोरण असायला हवे हे सुचविणे हे खरे तर सामाजिक कार्यकर्ता-विचारवंताचे काम असते. कार्ल मार्क्सने आपल्या कम्युनिस्ट घोषणापत्रातच स्त्रीवादाची, स्त्री-पुरुष समानतेची भूमिका मांडली असल्याचे ते सांगतात. सोबतच भारतात मार्क्सचे समकालीन असलेल्या फुलेंनी मांडलेल्या स्त्रीशूद्रातिशूद्र या भूमिकेबद्दल लेखक विस्ताराने बोलतात, मध्ययुगातील वारकरी, महानुभाव, लिंगायतानी उभ्या केलेल्या स्त्री-पुरुष समतेच्या डीस्कोर्सविषयीही ते बोलतात. पण असा व्यापक पट लक्षात घेऊनही आपल्याला प्रश्न पडतो की, स्त्रीशूद्रातिशूद्र या भूमिकेपासून सुरुवात केलेलं सिद्धांतन हे सत्यशोधकी, अब्राह्मणी, दलित-बहुजन स्त्रीवादाशी संवाद साधत बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने का न्यावयाचे आहे? स्त्रीदास्यजातवर्गअंतक सकल स्त्रीवादाच्या दिशेने का नाही? आणि स्त्रीवाद, दलितवाद व बहुजनवाद हे जर समग्रपणे विचार न करणारे व आपापल्या घटकापुरते विचार करणारे प्रवाह असतील तर मग बहुजन स्त्रीवाद हा कुठल्या समग्रतेची चर्चा करणारा विचार प्रवाह आहे असा दुसरा प्रश्न लगेच उपस्थित होतो.

एके ठिकाणी ते चाणक्यसुद्धा त्या अर्थाने ब्राह्मण नाही असे म्हणतात व उदारमतवादी असल्याचे सांगतात आणि ठिकठिकाणी उदारमतवादी ब्राह्मण्य हे कसे आभासी आहे याचीही चर्चा करताना दिसतात. असा विरोधाभासही या

पुस्तकात दिसतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मांडणी मूलतः यूरोसेंट्रीक आहे, म्हणजे ते युरोपच्या चष्म्यातून बघताहेत असे एक विधान एका ठिकाणी आले आहे तर दुसरीकडे बाबासाहेबासारखा महान माणूस त्यांच्या (महार) जातीत जन्माला आला, त्याने स्वतःच्या जातीचा नव्हे तर सगळ्या मानव समाजाचा नीट विचार करायचा प्रयत्न केला. कुणबी-मराठा, ब्राह्मण म्हणवणाऱ्या सगळ्या स्त्रियांना नवऱ्याच्या आणि बापाच्या संपत्तीमध्ये जो वारसाहक्क मिळाला आहे तो बाबासाहेबामुळेच असा उल्लेख येतो. आणखी एके ठिकाणी ते जमीन सुधारणाचे क्रेडीटही बाबासाहेबांना देताना कुणबी, माळी, साळी, कोष्टी, धनगर, वंजारी हे बाबासाहेबामुळेच जमिनीचे मालक झाल्याचे सांगतात. सत्तेसबंधी चिकित्सा करताना मातृसत्ताक, स्त्रीसत्ताक, पुरुषसत्ताक अशी मांडणी करीत म्हणतात की चारही वर्णांच्या पुरुषांनी स्त्रियांना खाजगी मालकीची संपत्ती मानले. ज्या स्त्रिया लग्नसंस्थेद्वारे कुटुंबसंस्थेच्या चौकटीत बंदिस्त झाल्या नाहीत, त्या सगळ्या समाजाच्या गणिका बनल्या किंवा वेश्या बनल्या. तेव्हा स्त्रिया ह्या जातिव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहेत असे म्हणणे कसे काय चुकीच्या सिद्धांतनाकडे घेऊन जाते याची चर्चा मात्र गायब आहे. जातिव्यवस्था ही उत्पादनाची व्यवस्था होती असे सोनवणे यांचे म्हणणे आहे. सोबतच जातीआधारित उत्पादनव्यवस्था ६ व्या शतकानंतर १२ व्या शतकापर्यंत स्थितीशील वा बंदिस्त होत गेली. या बंदिस्त होण्याच्या काळात स्त्रियाच्या लैंगिकतेचे केले गेलेले दमन महत्त्वपूर्णच ठरले असणार आहे तेव्हा त्याची विस्ताराने चर्चा करणे अपेक्षित असताना ते टाळून केवळ ब्रिटिशपूर्व आणि ब्रिटिशोत्तर अशा कालविभागणीत स्त्री प्रश्नाची चर्चा करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून होतो. लढा जर स्त्रीसत्ता विरुद्ध पुरुषसत्ता असा असेल तर या संपूर्ण लढाईची चर्चा उपरोक्त कालविभागणीनुसार करण्याने उत्तरे मिळणार नाहीत. लग्नसंस्था मोडकळीला आलेल्या व भांडवली आक्रमण तीव्र होण्याच्या काळात एकूणच जातव्यवहारही घट्ट होताना वा केला जात असताना दिसतो आहे. अशावेळी २१ व्या शतकातील आव्हानांची अधिक सखोल चर्चा होण्याची गरज आहे, असे म्हणावेसे वाटते. ●

---

बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने, विलास सोनवणे, हर्मिस प्रकाशन, पुणे, २०१७, किंमत रु. ८०/-

---

**(अमेरिकन ब्लॅक... पान ४८ वरून)**

वरील प्रकरणावरून एक बाब स्पष्ट होते की, कृष्णवर्णीय किंवा अल्पसंख्याक विद्यार्थी नोकरीसाठी इच्छुक उमेदवार आणि कंत्राटदार यांना गोऱ्यांएवढीच समकक्ष गुणवत्ता किंवा निकष पूर्तता करूनच AA कार्यक्रमाचा लाभ घेता येतो. तसेच, त्यांना कोटा प्रदान झाल्यावरही त्याचा लाभ घेणे किती कठीण आहे याची कल्पना येऊ शकते. थोडक्यात, अमेरिकेतील AA कार्यक्रम भारताच्या संविधानातील राखीव जागा ह्या तत्त्वाशी जुळणारा नसला तरी वंचित घटकासाठी सामाजिक न्यायाचे तत्व लागू केल्याची बाब यातून स्पष्ट होते.

ब्लॅक चळवळीने १९६०च्या दशकात काही महत्त्वपूर्ण कायदे संमत करण्यात यश मिळविले असले तरी त्यांचे लाभ घेण्यासाठी ब्लॅकनीही स्वयं सक्षम/पात्र होणे तेवढेच आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी त्यांच्या प्रगतीशील मूल्यव्यवस्थेची संकल्पना मांडली. ●